नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/02/2023 (शनिवार) दुपार

---

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**१) पो.स्टे. नरखेड : –** दिनांक १७/०२/२०२३ चे १७:०० वा. ते १७:३० वा. दरम्यान पो.स्टे. नरखेड हद्दीत फिर्यादीची अल्पवयीन भाची वय १७ वर्ष ३ महीने ही दिनांक १७/०२/२०२३ रोजी सायंकाळी ०५:०० वा. चे सुमारास ही घरून संडासला जाते म्हणुन डब्बा घेवुन निघुन गेली असता घरी रात्र झाली असता परत आली नसल्याने फिर्यादी याने गावातील परीसरात व मैत्रीणी तसेच नातेवाईकांकडे फोन लावुन विचारपुस केली असता मुली बाबत कोणतीही माहीती मिळुन न आल्याने तिला कोणीतरी अज्ञात ईसमाने तिचा अज्ञान पणाचा फायदा घेवुन फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश बोथले, मो. नं. ९८९०३७५३९६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर : –** दिनांक ११/२/२०२३ चे १८.०० वा. दरम्यान पो.स्टे. सावनेर हद्दीत फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष हीला आरोपी नामे– दिपक मरस्कोल्हे रा किरसाड, ता. नैनपुर (म.प्र.) ह.मु. सावनेर याने फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. ७४२ राठोड ९८२३०७४७४२ हे करीत आहे.

# फसवणुक

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत धंतोली काटोल येथे दिनांक १५/०२/२०२३ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— उषा रामचंद्र मुठाळ, वय ७४ वर्ष रा. धंतोली काटोल ही वयोवृध्द असुन ती सेवानिवृत्त शिक्षीका आहे. यातील नमुद घटणा वेळी व ठिकाणी आरोपी तिन अनोळखी इसमांनी फिर्यादीचे घरी येवुन शासनाचे कर्मचारी असल्याचे खोटे बोलुन फिर्यादी जवळुन आधार कार्ड, पॅनकार्ड, ए. टि. एम कार्ड, व ए. टि. एम कार्ड चा पिन क्रमांक घेवुन फिर्यादीचे भारतीय स्टेट बॅक शाखा काटोल मधील खात्या मध्ये असलेल्या २१,९९८/— रूपया पैकी २१,९००/— रूपये कोणत्यातरी ए. टि. एम. मशीन मधुन काढुन फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम १७०, ४१९, ४२० भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. १७३२ ज्योती सेवतकर पोस्टे काटोल मो. नं. ९५५२५५६३४१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**